ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-II, Issue-I June 2013

# प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या ताणतणाव व अध्यापन अभिवृत्तीचा तौलनिक अभ्यास

डॉ. विजय आधार पाटील,
शारीरिक शिक्षणशास्त्र प्रमुख,
कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय,
नवापूर, जि. नंदुरबार.
व
डॉ. सौ. गौरी विजय पाटील,
व्याख्याता,
श्री. सुरूपसिंग हिरया नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
नवापूर, जि. नंदुरबार.

*सारांश :*

*ताणतणावामुळे अध्ययन – अध्यापन प्रकिया ही पूर्णपणे कोलमडते व त्याचा परिणाम विद्यार्थ्यींच्या शैक्षणिक प्रगतिवर घडतो. अशा या ताणतणावाचा शिक्षकांच्या अध्यापनावर खरोखर परिणाम होतो काय ? त्यातून काही मार्ग सुचविता येईल काय ? ह्या प्रशांची उत्तरे शोधण्याच्या दृष्टीने शिक्षकांच्या ताणतणाव व अध्यापन अभिवृत्तीचा तौलनिक अभ्यास सदर संशोधनात केला आहे..*

**मुख्य सज्ञा : ताणतणाव, अध्यापन अभिवृत्ती.**

**प्रस्तावना :–**

"अध्यापन म्हणजे शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये होणरी आंतरक्रिया होय". या आंतरक्रियेच्या वारंवारितेवरही विद्यार्थ्यांची अध्ययन परिणामकारकता व शैक्षणिक प्रगती अवलंबुन असते. शिक्षक जेवढ्या चांगल्या पद्धतीने अध्यापनाचे कार्य करतील तेवढे विद्यार्थ्यांचे अध्ययन हे चांगले घडेल. प्रभावी व परिणामकसरक अध्ययन अध्यापनाची आंतरक्रिया घडून येण्यासाठी शिक्षक हा ताणतणावविरहीत असला पाहिजे. शिक्षकाला कोणत्याही प्रकारचा ताण नसावा. कारण ताणतणावामुळे अध्ययन–अध्यापन प्रक्रिया ही पूर्णपणे कोलमडते व त्याचा परिणाम विद्यार्थ्यींच्या शैक्षणिक प्रगतिवर घडतो. अशा या ताणतणावाचा शिक्षकांच्या अध्यापनावर खरोखर परिणाम होतो काय? त्यातून काही मार्ग सुचविता येईल काय? ह्या प्रशांची उत्तरे शोधण्याच्या दृष्टीने शिक्षकांच्या ताणतणाव व अध्यापन अभिवृत्तीचा तौलनिक अभ्यास हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

**संशोधनाची गरज :–**

शाळा ही एक विद्यार्थ्यां जीवनाच्या जडणघडणीची प्रयोगशाळा असल्याने शाळेत जे काही शिकविले जाते त्याचा प्रत्यक्ष संबंध त्याच्या शैक्षणिक प्रगतीशी व परीणामी सर्वांगीण व्यक्तीमत्वाशी असतो. विद्यार्थ्यांवर नेहमीच आपल्या चांगल्या शिक्षकाचा प्रभाव असतो. शिक्षक हे विद्यार्थ्यांचे आदर्श

असतात. परंतु जर शिक्षक प्रभावी अध्यापन करु शकत नसतील किंवा अध्यापन प्रक्रिया ही पूर्णपणे निरस घडवून आणत असतील तर त्याचा विपरीत परिणाम हा विद्यार्थ्यांवर होतो. विद्यार्थ्यांच्या मनात शाळेविषयी अनास्था निर्माण होते. अध्ययन निकोप घडवून आणण्यासाठी शिक्षकाने तसे वातावरण विद्यार्थ्यांना पुरविले पाहिजे. किंबहुना ही शिक्षकांची जबाबदारी आहे. शिक्षकांने अध्यापन करतांना ताणतणावविरहीत अध्यापन करणे हे त्यांच्या सोबत अध्यापन हे प्रभावी व परिणामकारक कसे घडवून आणता येईल याचा ध्यास नेहमी घेतला पाहिजे.

व्यक्ती जर विशिष्ट तणावाने प्रभावीत असेल तर त्या व्यक्तीचे वर्तन हे इतरांसाठी कारक किंवा उचित ठरत नाही. शिक्षक हा ताणतणावाचा शिकार ठरु नये असे मनापासुन वाटते. शिक्षकाने तणावविरहीत राहावे व अध्ययन अध्यापन प्रक्रिया परिणामकारक घडवून आणण्यासाठी हे संशोधन गरजेचे वाटते. यासाठी शिक्षकाला आपल्या ठिकाणी असलेला ताणतणव व अध्यापन अभिवृत्तीचे ज्ञान असणे जरुरी वाटते. म्हणून संशोधनासाठी हा विषय निवडण्याची गरज वाटली.

**संशोधनाचे महत्व :–**

आजच्या धकाधकिच्या काळात शिक्षक अध्यापनाचे कार्य करतांना विद्यार्थी हिताचा विचार कमी करतात व केवळ अध्यापन करणे हे आपले कर्तव्य जबाबदारी आहे असे मानतात. याच विचाराने शिक्षणप्रक्रिया चालत आहे असा अंदाज येतो. त्यातच शिक्षक हा ताणतणावाचा शिकार ठरत आहे. त्यामुळे त्याच्या अध्यापन कार्याकडे सांशक दृष्टिने पाहिले जाते. यासाठी आजच्या या स्पर्धेच्या युगात शिक्षकांना स्वतःची क्षमता सिध्द करणे खूप आवश्यक आहे.

शिक्षकांनी अध्यापन हे प्रभाविपणे व परिणाम कारकरित्या घडवून आणले आहे की नाही त्याचा परिणाम हा त्या विद्यार्थ्यांच्या प्रगतीवरुन व मूल्यमापनावरुन लावता येवू शकतो.

आजच्या या स्पर्धेच्या युगात प्रत्येक व्यक्तीला ताणतणावाने ग्रांसलेले आहे. त्यामुळे शिक्षक ही त्यास अपवाद नाही. कारण शिक्षक हा शेवटी एक माणूसच आहे. परंतु शिक्षकाने आपल्या ताणतणावाचा प्रभाव कोणत्याही प्रकारे अध्यापनावर पडणार नाही याची खबरदारी स्वतः घेणे उचित ठरते. तो शिक्षकाचा एक कर्तव्याचाच भाग आहे. म्हणून तणावविरहीत अध्यापन करण्यासाठी व संपूर्ण शिक्षणप्रक्रिया ही प्रभावी व परिणामकारक घडवून आणण्यासाठी शिक्षकांच्या ताणतणावाचे व्यवस्थापन करणे गरजेचे ठरते.

शिक्षकांना त्यांच्या ठिकाणी असलेला ताणतणाव व अध्यापन अभिवृतीची जर माहिती करुन दिली तर हे दोन्ही घटक ऐकमेकांवर कसे अवलंबून असतात. याचे ज्ञान शिक्षकाला होईल. संस्थाचालक व मुख्यध्यापक तणावाचे व्यवस्थीतरित्या व्यवस्थापन करुन व अध्यापन परिणामकारक घडवून आणण्यासाठी योग्य ते प्रयत्न करतील.

**उद्दिष्टये :–**

1. प्राथमिक शाळेतील पुरुष शिक्षकांच्या ताणतणावाचा शोध घेणे.
2. प्राथमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांच्या ताणतणावाचा शोध घेणे.
3. प्राथमिक शाळतील पुरुष शिक्षक व स्त्री शिक्षीका यांच्या ताणतणावाची तुलना करणे.

4. प्राथमिक शाळेतील पुरुष शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीचा शोध घेणे.
5. प्राथमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांच्या अध्यापन अभिवृत्तीचा शोध घेणे.
6. प्राथमिक शाळेतील पुरुष शिक्षक व स्त्री शिक्षिका यांच्या अध्यापन अभिवृत्तीचा तुलना करणे.

**परिकल्पना :–**

1. प्राथमिक शाळेतील शिक्षक व शिक्षिकांचा ताणतणाव यामध्ये कोणताही फरक आढळत नाही.
2. प्राथमिक शाळेतील शिक्षक व स्त्री शिक्षिका याच्या अध्यापन अभिवृत्तीत कोणताही फरक आढळत नाही.

**गृहिते :–**

1. सर्व शिक्षक हे प्राथमिक स्तरातील विद्यार्थ्यांना अध्यापन करतात.
2. हे शिक्षक वेगवेगळया विषयाचे पदविधर आहेत.
3. हे शिक्षक वेगवेगळया वयोगटाचे आहेत.

**कार्यात्मक व्याख्या :–**

**प्राथमिक शाळेतील शिक्षक :–**

प्राथमिक शाळेत म्हणजेच इ. 1 ली ते 8 वी पर्यंत शिकविणारे शिक्षक

**ताणतणाव :–**

डॉ. अजय ताम्हणे लिखीत चाचणीतुन शिक्षकांना मिळालेले गुण म्हणजे ताणतणाव होय.

**अध्यापन अभिवृत्ती :–**

डॉ. एस. पी. अहलुवालीया लिखीत चाचणीतून शिक्षकांना मिळालेले गुण म्हणजे अध्यापन अभिवृत्ती होय.

**व्याप्ती व मर्यादा :–**

**व्याप्ती :–**

सदर संशोधन हे शिक्षकांचा ताणतणाव व अध्यापन अभिवृत्तीचा तौलनिक अभ्यासावर आधारीत आहे. या संशोधनाचे निष्कर्ष हे नवापूर तालुक्यातील प्राथमिक शाळेतील शिक्षकांना लागू पडेल. प्रस्तुत संशोधन प्राथमिक शाळेतील स्त्री शिक्षिका व पुरुष शिक्षकांवर केले जाणार आहे.

**मर्यादा :–**

सदर संशोधन हे नवापूर तालुक्यातील प्राथमिक शाळेतील शिक्षकांपुरतेच मर्यादीत आहे.

**संशोधन पध्दत :–**

या संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीमधील सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे.

**जनसंख्या :–**

प्रस्तुत संशोधनासाठी जनसंख्या ही नवापूर तालुक्यातील प्राथमिक शाळेतील शिक्षक आहे.

**न्यादर्श :–**

प्रस्तुत संशोधनासाठी 60 शिक्षक हे न्यादर्श म्हणून निवडले. न्यादर्श पध्दतीमधील संभाव्यता पध्दती मधील सुगम यादृच्छिक पध्दतीच्या आधारे न्यादर्शाची निवड ही लॉटरी पध्दतीने केली गेली.

60 प्राथमिक शाळेतील शिक्षक

30 प्राथमिक शाळेतील पुरुष शिक्षक | 30 प्राथमिक शाळेतील स्त्री शिक्षिका

**साधने :–**

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या ताणतणावाचे मापन करण्यासाठी डॉ. अजय ताम्हणे यांची चाचणी वापरण्यात आली. तसेच अध्यापन अभिवृत्तीचे मापन करण्यासाठी डॉ. एस.पी. अहलूवालीया यांची चाचणी वापरण्यात आली.

**संख्याशास्त्रीय तंत्र :–**

प्रस्तुत संशोधनासाठी मध्यमान , प्रमाणविचलन, **t**-मूल्य या संख्याशास्त्रीय तंत्रांचा उपयोग केला गेला.

**महितीचे विश्लेषण व अन्वयार्थ :–**

ताणतणाव चाचणीच्या आधारे संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण केले आणि या माहितीचा अन्वयार्थ लावण्यासाठी मध्यमान, मध्यांक, बहुलक, प्रमाणविचलन, चतुर्थक विचलन, शततमक, विषमितता, शिखरपृष्ठता, **t**-मूल्य या सांख्यिकीय तंत्राचा उपयोग करुन त्यावरुन पुढील तक्त्यांच्या आधारे निष्कर्ष मांडले.

**सारणी क. 1 प्राथमिक शाळेतील पुरुष शिक्षक यांना ताणतणाव चाचणीच्या आधारे मिळालेल्या गुणांवरुन केलेले संख्याशास्त्रीय विश्लेषण.**

| परिवर्तक (चल) | सांख्यिकी प्रकार |
|---|---|
| प्राथमिक शाळेतील पुरुष शिक्षक | न्यादर्श (N) …………………… 30<br>मध्यमान (Mean)……………. 11.4<br>मध्यांक (Median)…………….11.25<br>बहुलक (Mode) ……………… 10.95<br>प्रमाण विचलन (Std. Deviation) 3.21<br>विषमितता (skewness) ……….. 0.14<br>शिखरपृष्ठता (kurtosis) …………. 0.22 |

**सारणी क. 2 प्राथमिक शाळेतील स्त्री शिक्षिका यांना ताणतणाव चाचणीच्या आधारे मिळालेल्या गुणांवरुन केलेले संख्याशास्त्रीय विश्लेषण**

| परिवर्तक (चल) | सांख्यिकी प्रकार |
|---|---|
| प्राथमिक शाळेतील स्त्री शिक्षिका | न्यादर्श (N) ....................... 30<br>मध्यमान (Mean)............... 9.4<br>मध्यांक (Median)...............8.03<br>बहुलक (Mode) ................. 8.19<br>प्रमाण विचलन (Std. Deviation) 4.5<br>विषमितता (skewness) .......... 0.93<br>शिखरपृष्ठता (kurtosis) ............ 0.24 |

**सारणी क. 3 प्राथमिक शाळेतील पुरुष शिक्षक व स्त्री शिक्षिका यांच्या ताणतणावाची तुलना**

| प्राथमिक शाळेतील शिक्षक | मध्यमान | प्रमाण विचलन | t - मूल्य |
|---|---|---|---|
| पुरुष शिक्षक | 11.4 | 3.21 | 2.5 |
| स्त्री शिक्षक | 9.4 | 4.5 | |

वरील सारणीनुसार प्राथमिक शाळेतील पुरुष शिक्षक व स्त्री शिक्षिका यांच्या ताणतणावाची तुलना केली असता त्यांच्यातील फरक हा सार्थक दिसून आला. प्राप्त t - मूल्य हे 2.15 असून ते नमुना t – मूल्यापेक्षा जास्त आहे. नमूना t - मूल्य हे df 58 करीता 0.05 स्तरावर 2.00 आहे. म्हणून परिकल्पना नं 1 चा त्याग करावा लागेल व त्यावरुन असा अर्थ लावता येईल की प्राथमिक शाळेतील पुरुष व स्त्री शिक्षिका यांच्या ताणतणावामध्ये फरक आढळून येतो.

**सारणी क. 4 प्राथमिक शाळेतील पुरुष शिक्षक यांना अध्यापन अभिवृत्ती चाचणीच्या आधारे मिळालेल्या गुणांवरुन केलेले संख्याशास्त्रीय विश्लेषण.**

| परिवर्तक (चल) | सांख्यिकी प्रकार |
|---|---|
| प्राथमिक शाळेतील पुरुष शिक्षक | न्यादर्श (N) ....................... 30<br>मध्यमान (Mean)............... 243.87<br>मध्यांक (Median)...............242.07<br>बहुलक (Mode) ................. 253.47<br>प्रमाण विचलन (Std. Deviation) 16.24<br>विषमितता (skewness) .......... 0.59<br>शिखरपृष्ठता (kurtosis) ............ 0.033 |

**सारणी क. 5 प्राथमिक शाळेतील स्त्री शिक्षिका यांना अध्यापन अभिवृत्ती चाचणीच्या आधारे मिळालेल्या गुंणांवरुन केलेले संख्याशास्त्रीय विश्लेषण.**

| परिवर्तक (चल) | सांख्यिकी प्रकार |
|---|---|
| प्राथमिक शाळेतील स्त्री शिक्षिका | न्यादर्श (N) ...................... 30<br>मध्यमान (Mean)............... 255.86<br>मध्यांक (Median)...............255.5<br>बहुलक (Mode) ................. 221.8<br>प्रमाण विचलन (Std. Deviation) 20.90<br>विषमितता (skewness) .......... 0.50<br>शिखरपृष्ठता (kurtosis) ............ 0.52 |

**सारणी क. 6 प्राथमिक शाळेतील पुरुष शिक्षक व स्त्री शिक्षिका यांच्या अध्यापन अभिवृत्तीची तुलना**

| प्राथमिक शाळेतील शिक्षक | मध्यमान | प्रमाण विचलन | t - मूल्य |
|---|---|---|---|
| पुरुष शिक्षक | 243.87 | 16.24 | 2.48 |
| स्त्री शिक्षक | 255.86 | 20.90 | |

वरील सारणीनुसार प्राथमिक शाळेतील पुरुष शिक्षक व स्त्री यांच्या अध्यापन अभिवृत्तीची तुलना केली असता त्याच्यातील फरक हा सार्थक दिसून आला. प्राप्त t नमुना मूल्यापेक्षा जास्त आहे. नमुना t मूल्य हे df 58 करीता 0.05 स्तरावर 2.00 आहे. म्हणून परिकल्पना नं. 2 चा त्याग करावा लागेल व त्यावरुन असा अर्थ लावता येईल की प्राथमिक पुरुष शिक्षक व स्त्री शिक्षिका यांच्या अध्यापन अभिवृत्तीमध्ये फरक आढळून येतो.

**निष्कर्ष :—**

1. प्राथमिक शाळेतील शिक्षक व स्त्री शिक्षिका यांच्या ताणतणावाची तुलना केली असता यांच्या ताणतणावामध्ये फरक आढळून येतो.
2. प्राथमिक शाळेतील पुरुष शिक्षकाचे ताणतणावाचे सरासरी प्रमाण हे प्राथमिक शाळेतील स्त्री शिक्षिकाच्या ताणतणावाच्या सरासरी प्रमाणापेक्षा जास्त आहे.
3. प्राथमिक शाळेतील पुरुष व स्त्री शिक्षिका यांच्या अध्यापन अभिवृत्तीची तुलना केली असता यांच्या अध्यापन अभिवृत्तीमध्ये फरक आढळून येतो.
4. प्राथमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांचे अध्यापन अभिवृत्तीचे सरासरी प्रमाण हे प्राथमिक शाळेतील पुरुष शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तीच्या सरासरी प्रमाणापेक्षा जास्त आहे.

**संदर्भ ग्रंथ :–**

1. भितांडे वि. रा. (1989) शैक्षणिक संशोधन पध्दती, पुणे नूतन प्रकाशन
2. डॉ. सुमन करदींकर (2006) ज्येष्ठ शिक्षक हो, नाशिक Y.C.M.O.U. महाराष्ट्र शासन
3. पसळेकर आशा, मुलाचे मानसिक तणाव आणि उपचार, पुणे उमेष प्रकाशन
4. बर्वे राजेंद्र (2007) मानसिक ताणतणाव कसा रोखाल, पुणे, मानेविकास प्रकाशन
5. प्र.श्रा. चौधरी (2001) शालेय शिक्षणाचे अधिष्ठान व शिक्षणाचे विशेष क्षेत्रे, जळगांव व्यंकटेश प्रकाशन.